**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२६**

**---------------------------**

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ / फाल्गुन २२, १९४७ (शके)**

**(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**
**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(७) वस्त्रोद्योग मंत्री**
**(८) सहकार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

**-----------------------------**

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

**-----------------------------**

**राज्यातील मुलींना शैक्षणिक व परीक्षा शुल्क माफी योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

**(१) * २५३११ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुलींना मोफत शिक्षण मिळावे या उद्देशाने शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क संपूर्ण माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना या योजनेचा लाभ अद्याप मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास किंवा इतर कोणत्याही शासकीय शिष्यवृत्तीचा लाभ घेतल्यास केवळ एका योजनेचा लाभ घेणे बंधनकारक असल्यामुळे प्रवेश प्रक्रियेच्या वेळी अनेक मुलींना या शुल्कमाफी योजनेपासून वंचित ठेवले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने रुपये ९०६ कोटी इतकी तरतूद करूनही शैक्षणिक संस्थांकडून संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरण्याचा तगादा लावून शुल्क वसूल केले जात असून ‘परतावा नंतर दिला जाईल’ असे सांगूनही प्रत्यक्षात शुल्क परत केले जात नसल्यामुळे पालक व विद्यार्थिनींवर आर्थिक ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संपूर्ण शुल्क भरल्याशिवाय परीक्षेला बसू दिले जात नसणे, अर्ज प्रक्रियेत असलेली गुंतागुंत व प्रशासकीय अडथळे यांमुळे सदर योजनेच्या मूळ उद्देशापासून लाखो मुली वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करून प्रवेशाच्या सुरुवातीलाच मुलींना योजनेचा लाभ मिळणेसह, 'आधी शुल्क भरा - नंतर परतावा' ही पद्धत बंद करण्यासाठी शैक्षणिक संस्था चालकांशी समन्वय साधून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतन / सावर्जनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचेवार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात आली आहे.

(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या उपरोक्त दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, खाजगी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना या योजनेचा लाभ लागू नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी पूर्व-प्राथमिक शाळांची नोंदणी पोर्टलवर अनिवार्य करण्याबाबत

**(२) * २३४६४ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व खाजगी पूर्व-प्राथमिक (Pre-Primary) शाळांवर नियमन व नियंत्रण आणण्यासाठी त्यांची सात दिवसांच्या आत शासनाकडे नोंदणी करणे बंधनकारक असल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेश निर्गमित होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही खाजगी पूर्व-प्राथमिक शाळांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिपत्रकात नोंदणी अनिवार्य असल्याचे स्पष्ट नमूद असताना शिक्षण आयुक्तांनी नोंदणी ऐच्छिक असल्याचे विधान केल्यामुळे शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्यास अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पूर्व-प्राथमिक शाळांची नोंदणी पोर्टलवर बंधनकारक करण्याच्या निर्णयाचे पालन न करणाऱ्या संबंधित शाळांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) वयोगट ३ ते ६ करिता पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी केंद्रांची माहिती एकत्रित स्वरूपात राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर, तसेच पालकांनाही उपलब्ध व्हावी याकरिता वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी या शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर करण्याबाबत दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. आतापर्यंत राज्यातील १२,७३३ इतक्या पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी झालेली आहे व इतर खाजगी पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थांना देखील नोंदणी करण्याविषयी आव्हान करण्यात आलेले आहे.

तथापि, राज्यातील पूर्व प्राथमिक शाळांचे नियमन करण्यासाठी सद्य:स्थितीत कायदा अस्तित्वात नाही. या पार्श्वभूमीवर खाजगी बालवाटिकांच्या पूर्व प्राथमिक शाळा नोंदणी संदर्भात अधिनियम प्रस्तावित करण्यात येणार आहे. सदर अधिनियमाचा मुख्य उद्देश राज्यातील सर्व खाजगी बालवाटिकांची अनिवार्य नोंदणी, नियमन व गुणवत्ता सुनिश्चित करणे हा असणार आहे. या अधिनियमाअंतर्गत बालवाटिकांच्या नोंदणीसाठी सक्षम प्राधिकरणाची नेमणूक, ऑनलाइन पोर्टलद्वारे नोंदणी प्रक्रिया, नोंदणीची वैधता (३ वर्षे) व नूतनीकरणाची तरतूद करण्यात येणार आहे. नोंदणीविना कोणतीही बालवाटिका चालविण्यास मनाई करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातील कृषी विभागाच्या तत्कालीन परीक्षा समन्वयकाने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(३) * ३०९९५ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातील कृषी विभागाचे तत्कालीन परीक्षा समन्वयक यांच्याकडे प्रशासकीय अधिकारी व अवर सचिव या पदांचा अतिरिक्त कार्यभार असताना त्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांनी सानुग्रह अनुदान व मानधनापोटी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वेतनाचा दाखला देऊन सुमारे रुपये १५ लाख इतकी रक्कम प्राधिकरणाकडून अनुचितरित्या स्वीकारल्याची तक्रार प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, आय.टी. विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संगनमताने संबंधितांनी काही शैक्षणिक संस्थांकडून तसेच प्रती विद्यार्थी एजन्सीकडून अनुचितरित्या रक्कम उकळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित कर्मचारी वर्ग-३ मधील असूनही त्यांच्याकडे प्रशासकीय अधिकारी, परीक्षा समन्वयक व अवर सचिव या वर्ग-१ पदांचा कार्यभार सोपविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०.११.२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावानुसार तत्कालिन परीक्षा समन्वयक (कृषी) हे अनेक पदांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत असल्यामुळे त्यांना सहसंचालक पदाचे मूळ वेतन अधिक महागाई भत्ता देऊन मानधन लागू करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यांनी सहसंचालक या पदाच्या उच्चतम वेतन श्रेणीच्या वेतन पावतीच्या आधारे दिवाळी सानुग्रह व मानधनाचा दावा केला होता. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अहवालानुसार त्यांना एकूण रू.६,१०,५३७/- इतके अतिरिक्त मानधन अदा केल्याचे दिसून येते. तथापि, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २०.०१.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत तत्कालीन कृषी समन्वयक यांच्या विरोधात प्राधिकरणाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली व उपरोक्त ठराव नियमास अनुसरून नसल्याचे निदर्शनास आल्याने तो ठराव पूर्वलक्षी प्रभावाने तात्काळ रद्द करण्याचे ठरविण्यात आले.
(३) अशा आशयाची थेट तक्रार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे प्राप्त झालेली नाही.
(४), (५) व (६) कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, यांच्या दिनांक २३.०७.२०२१ रोजीच्या आदेशानुसार, अधिक्षक, राष्ट्रीय कृषी संधोधन प्रकल्प, कर्जत, जि.अहिल्यानगर यांची राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष येथे अधीक्षक (परीक्षा समन्वयक) या पदावर बदली करण्यात आली व ते दिनांक २९.०७.२०२१ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष येथे कृषी विभागाच्या परीक्षा समन्वयक या पदावर रुजू झाले. तसेच, परीक्षा समन्वयक (कृषी) यांच्याकडे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील प्रशासकीय अधिकाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १४.०१.२०२२ ते दिनांक २३.१२.२०२४ पर्यंत व अवर सचिव (प्रवेश नियामक प्राधिकरण) यांचा अतिरिक्त कार्यभार दिनांक २९.०६.२०२२ ते २४.१२.२०२४ पर्यंत सोपविण्यात आला होता. परीक्षा समन्वयक (कृषी) यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारी प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २०.०१.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत सादर केल्या असता, त्यांची प्रतिनियुक्ती तात्काळ प्रभावाने रद्द करुन त्यांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर परत पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार त्यांना दिनांक १४.०८.२०२५ रोजी राज्य

सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातून कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या जागी अन्य वर्ग-१ अधिकारी यांना स्थलांतरित आदेशाद्वारे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष येथे रुजू करून घेण्यात आले आहे. तसेच, संबंधीत कर्मचाऱ्याची विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत त्यांच्या मूळ आस्थापनेस कळविण्यात आले असून, त्यांना अदा करण्यात आलेली अतिरिक्त रक्कम राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या लेखा विभागाकडे जमा करण्याबाबतचे आदेश प्रवेश नियामक प्राधिकरणाने दिले आहेत. आजपर्यंत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत त्यांना ना-देय (No Due) प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आलेली नाहीत. सदर कर्मचा-यांने प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्यवाही विरोधात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याबाबत

**(४) * २८६५० श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिनांक ०१ मार्च, २०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये मराठी भाषा विषय सक्तीचा करण्यात आला असून मराठी भाषा अध्यापन व अध्ययन अनिवार्यपणे राबविण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर निर्णय शासकीय, खाजगी तसेच आयसीएसई, सीबीएसई, आयबी आदी सर्व मंडळांच्या शाळांना बंधनकारक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील काही नामांकित खाजगी शाळांकडून सदर निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित खाजगी शाळांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत दिनांक ९ मार्च, २०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतचा अधिनियम लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०२० पासून करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदर अधिसूचनेस अनुसरुन, महाराष्ट्र राज्यातील सर्व परीक्षा मंडळांचे अभ्यासक्रम असलेल्या, सर्व माध्यमांच्या शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करणेबाबत या विभागाच्या दिनांक ०१ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे

अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक यांना निर्देश देण्यात आले आहेत. दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक यांना पुनश्च निर्देश देण्यात आले आहेत.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

मराठी भाषा विषय सक्तीची अंमलबजावणी प्रभावीपणे होते किंवा कसे याची खात्री करण्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, राज्यमंडळाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा विषय सक्तीची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी विविध क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीच्या आधारे, शासनास दिनांक ०१.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच, राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची दक्षता सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी असे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे.

ज्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याचे विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या निदर्शनास आल्यास तसा अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश असून, तसा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरुन संबंधित शाळेवर कारवाई करण्याबाबत देखील दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(५) * ३०७७० श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी निर्गमित शासन आदेशान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखांपेक्षा कमी असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाची मर्यादा १०० टक्के करण्यात आली असून सदर लाभ प्रथम वर्षापासून अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू राहील असे निर्देशित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने अनाथ मुलांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीसाठी विविध शासन निर्णयांद्वारे नोकरीत १ टक्का आरक्षण तसेच १०० टक्के शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर अर्ज भरताना 'अनाथ' असा स्वतंत्र पर्याय उपलब्ध नसल्यामुळे त्यांना राजर्षी छत्रपती शाहू

महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सदर योजनेंतर्गत अनाथ विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्तीऐवजी कमी रक्कम मंजूर होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनाथ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेत सुलभता यावी यासाठी महाडीबीटी (MahaDBT) प्रणालीमध्ये आवश्यक तांत्रिक सुधारणा करून 'अनाथ' विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र पर्याय, आवश्यक प्रमाणपत्रे व पालकांच्या मृत्यू दाखल्याची स्वतंत्र जोडणी (लिंक) उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, शिष्यवृत्तीची रक्कम विलंबाने मिळत असल्यामुळे काही महाविद्यालये व शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांकडून किमान ५० टक्के शुल्क आगाऊ भरल्याशिवाय परीक्षेस बसू देत नसल्याने अशा प्रकारास प्रतिबंध करण्यासाठी तसेच महाडीबीटी (MahaDBT) प्रणालीतील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशीत तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) विद्यार्थीनींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ०६.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनाथांना शासकीय नोकरीत व शिक्षणात १ टक्के आरक्षण देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाचा लाभ "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या पात्र अनाथ मुले व मुली यांना सुध्दा अनुज्ञेय करण्यात आला आहे. त्याकरीता संबंधित प्रशासकीय विभागाकडून आर्थिक तरतूद करणे आणि सदर लाभाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने, महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक १७.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission

Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या, नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) अनाथ बालकांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के लाभ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना महिला व बाल विकास विभागाकडून अनाथ विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त करून राबविण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांसाठी महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक १७.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनाथ प्रवर्गातील मुला/मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क याकरीता १०० टक्के लाभ मंजूर करण्याची योजना ऑफलाईन पध्दतीने राबविली जाते.

(६) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १७.०७.२०२५ अन्वये शिक्षण संस्थेस शासनाकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क अदा करण्यास काही कारणास्तव विलंब झाल्यास शिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्याला शिक्षणापासून तसेच परीक्षा देण्यापासून रोखण्यात येवू नये, अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.

-----------------

### जव्हार (जि.पालघर) जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक गैरहजर राहत असल्याबाबत

**(६) * २८७०८ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण २५८ शाळांमध्ये सुमारे १५ हजार ३०० विद्यार्थ्यांची नोंद असल्याचे दाखविण्यात येत असून प्रत्यक्षात अनेक शाळांमध्ये दाखविण्यात येणारी विद्यार्थी पटसंख्या व शाळेत प्रत्यक्ष उपस्थित असलेले विद्यार्थी यामध्ये मोठी तफावत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर तालुक्यातील अनेक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक नियमित गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या गैरहजेरीमुळे संबंधित शाळांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने खोटी पटसंख्या दाखविणाऱ्या संबंधितांवर तसेच शाळेत नियमित गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) जिल्हा परिषद शाळांमध्ये अनधिकृतरित्या गैरहजर राहणाऱ्या अथवा अनियमिततेबाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही केली जाते. त्याअनुषंगाने शाळेत गैरहजर राहणाऱ्या एका शिक्षकाची विभागीय चौकशी सुरु आहे.

-----------------

## विदर्भातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(७) * २३१७९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी मागील दोन दशकात विदर्भात ८२ सिंचन प्रकल्पांचे काम सुरू असून सद्य:स्थितीत यातील केवळ १४ प्रकल्पांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित सर्व प्रकल्प अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण प्रकल्पांपैकी कोणत्या प्रकल्पाचे किती काम पूर्ण झाले आहे तसेच, प्रकल्पाची किंमत व अद्यापपर्यंत खर्च करण्यात आलेला निधीचा तपशील किती आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पांपैकी ८ प्रकल्प केवळ जमीन हस्तांतरणा अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) सन २०२५-२६ च्या आखणीनुसार विदर्भात ८२ बांधकामाधीन प्रकल्प असून, त्यापैकी १४ प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आले आहेत. उर्वरित ६८ सिंचन प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

विदर्भातील ७,८४,७२० हे. सिंचन अनुशेषापैकी माहे जून, २०२५ अखेर ७,४१,१८५ हे. (९४%) इतका सिंचन अनुशेष दूर करण्यात आला असून अकोला व बुलढाणा जिल्ह्यात एकूण ४३,५३५ हे. अनुशेष शिल्लक आहे.

(२) प्रगतीपथावरील उर्वरित ६८ सिंचन प्रकल्पांची अद्यावत किंमत सुमारे ₹१.४२ लक्ष कोटी इतकी असून माहे मार्च, २०२५ अखेर ०.५७ लक्ष कोटी खर्च झाला आहे. या प्रकल्पांची अंतिम सिंचन क्षमता १४.५६ लक्ष हे. इतकी असून माहे जून, २०२५ अखेर ७.३६ लक्ष हे. सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.

(३) उपरोक्त ८ सिंचन प्रकल्पांपैकी हुमन नदी, तुलतुली प्रकल्प, चेन्ना नदी या तीन प्रकल्पांना वनजमिन मान्यता तसेच, कारवाफा, डुरकानगुड्रा, पिपरी रिठ, पुलखल व डुमी नाला या पाच प्रकल्पांना भूसंपादना अभावी प्रकल्पांची कामे प्रलंबित आहे.

(४) १. हुमन मोठा प्रकल्पाचा प्रस्ताव वन विभागास सादर करण्यात आलेला आहे.

२. चेन्ना नदी प्रकल्पाचा वनप्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

३.तुलतुली प्रकल्पाच्या प्रस्तावास वन विभागाने मंजुरी नाकारली आहे. फेरनियोजनाची प्रक्रीया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. तसेच ४. कारवाफा प्रकल्प, ५. डुरकानगुड्रा प्रकल्प, ६. पिपरी रिठ प्रकल्प, ७. पुलखल प्रकल्प व ८. डुमी नाला प्रकल्प असे ५ प्रकल्प सद्यःस्थितीत ग्रामपंचायतीचे ठराव व पर्यायी जमीन इ. कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील खाजगी शिक्षण संस्थांनी 'पवित्र' पोर्टल डावलून केलेल्या शिक्षक भरतीबाबत**

**(८) * २६२५१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही खाजगी शिक्षण संस्थांनी शिक्षक भरतीसाठी शासनाच्या पवित्र पोर्टलचा अवलंब न करता परस्पर आर्थिक गैरव्यवहार करुन थेट भरती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलद्वारे मानक कार्यपद्धतीनुसारच भरती करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही सदर आदेशांचे उल्लंघन करून खाजगी शिक्षण संस्थांनी परस्पर भरती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने अशा खाजगी शिक्षण संस्थांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) शासन अधिसूचना दिनांक २२ जून, २०१७ तसेच शासन निर्णय, दिनांक २३ जून, २०१७ अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खाजगी संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांची भरती प्रक्रिया पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि, काही शैक्षणिक संस्थांनी शिक्षकांची रिक्त पदे त्यांच्या स्तरावर भरली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३), व (४) पवित्र पोर्टल प्रणाली लागू झाल्यानंतर मधील काही काळात सदर पोर्टल बंद होते अशी सबब पुढे करुन काही संस्थांनी त्यांच्या स्तरावर शिक्षक पदभरती केली आहे. यापैकी काही प्रकरणात अशा नियुक्त्यांना मान्यता द्यावी असे आदेश मा. उच्च न्यायालयाने पारीत केले आहेत. अशा प्रकारचा मुळ आदेश ज्या प्रकरणात पारीत झाला होता, त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. १०५४९/२०२५ मध्ये दिनांक ०७.१०.२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये अंतरिम स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे अशा स्वरुपाच्या उर्वरीत प्रकरणात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्यास सहमती दर्शविण्याबाबतचा प्रस्ताव विधि व न्याय विभागास सादर करण्यात आला आहे. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयात अशा याचिका शासनाच्यावतीने लवकरच दाखल करण्याचे नियोजित आहे.

रिट याचिका क्र.६९४९/२०२५ व इतर समान स्वरुपाच्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६.१०.२०२५ रोजी पारीत केलेल्या न्यायनिर्णयानुसार पवित्र पोर्टल कार्यान्वित झाल्यानंतरच्या काळात पोर्टलशिवाय झालेल्या नियुक्त्यांची तपासणी करण्यासाठी संबंधित शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली विभागनिहाय समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. शिवाय पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीबाबत मानक कार्यपध्दती निश्चित करण्याचे देखील सूचित केले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. पवित्र पोर्टलशिवाय करण्यात आलेल्या नियुक्त्या शासन धोरणाशी विसंगत असल्याने त्यास मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाई (जि.सातारा) तालुक्यातील पूर्व भागातील गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) * २९७३० श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (जि.सातारा) तालुक्यातील पूर्व भागातील सुमारे २८ ते ३० गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नसून या तालुक्यात धोम (बलकवडी) धरण असताना त्यामधील पाणी मात्र फलटण, बारामती, इ. तालुक्यांना जाते व तेथील स्थानिक गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कवठे केंजळ योजना ही या भागासाठी कार्यरत असताना या योजनेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याने पूर्व भागातील कित्येक गावे या पाण्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धोम धरणातून सायफन पद्धतीने या भागात पाणी येत असताना प्रशासनाच्या निष्क्रीयतेमुळे हा विभाग पिण्याच्या तसेच शेतीकरीता लागणाऱ्या पाण्यापासून वंचित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुळूंब, चांदक, आनंदपूर, मायुरेश्वर, केंजळ, सुरूर, कवठे, वहागाव, मोहडेकरवाडी, भिलारवाडी, वेळे इ. सुमारे २८ ते ३० गावांनी पाणी हक्क समिती मार्फत शासनाला तक्रारी, निवेदने देऊनही संबंधित विभागाचे अधिकारी पूर्वीच्या योजनेतील गैरव्यवहार लपविण्यासाठी त्यांच्यावर कोणतीच कारवाई करत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने वाई तालुक्यातील पूर्व भागातील सुमारे २८ ते ३० गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध देण्याकरिता कार्यवाही करण्यासह संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अशंत: खरे आहे.

वाई (जि.सातारा) तालुक्यातील पूर्व भागातील सुमारे २७ गावांना कवठे केंजळ उपसा सिंचन योजनेव्दारे सिंचनासाठी पाणी देणे नियोजित आहे. धोम धरणातील १.२८ टिएमसी पाणी प्रकल्प अहवालानुसार मंजूर आहे. सद्य:स्थितीत योजनेचे ९३ % काम पूर्ण झालेले असून सध्या १२ गावांना सिंचनासाठी पाणी अवर्तनाद्वारे दिले जात आहे. या योजनेच्या कामात अपेक्षीत प्रगती साध्य न झाल्याने दिनांक १६/१२/२०२१ रोजी निविदा रद्द करण्यात आली. त्याविरुध्द ठेकेदाराने जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला असून मा. न्यायालयाने कामास स्थगिती दिली आहे. त्यामुळे उर्वीरत १५ गावांची मुख्य वितरीकेची कामे अपूर्ण असल्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करता आले नाही. वाई तालुक्यातील धोम बलकवडी प्रकल्पांतर्गत भोर तालुक्यातील १०५० हे. (ICA) खंडाळा तालुक्यातील ४३०० हे. (ICA) व फलटण तालुक्यातील १२७५० हे. (ICA) क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. प्रकल्प अहवालानुसार वरीलप्रमाणे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सातारा जिल्हयातील वाई तालुक्यातील १. बालेघर २. मांढरदेव ३. गुंडेवाडी ४. आनंदपूर या ४ गावांना आणि १. बालेघर अंतर्गत कासुर्डेवाडी /अनपटवाडी व २. मांढरदेव अंतर्गत गडगेवाडी या २

वाडया-वस्त्यांना दिनांक ११/०४/२०२५ ते दिनांक २७/०५/२०२५ या तीव्र टंचाई कालावधीमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

कवठे केंजळ योजनेत कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

या योजनेची बहुतांश कामे पूर्ण होत आलेली आहेत. परंतू सद्य:स्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मुख्य वितरिकेची कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. यास्तव १५ गावे पाण्यापासून वंचित राहिली आहेत. सन २०२१ पासून योजनेची उर्वरित कामे बंद असल्याने सध्या १२ गावांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध केले जाते. उर्वरित १५ गावांची मुख्य वितरीकेची कामे अपूर्ण असल्याने पाणी उपलब्ध करून देता आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

धोम प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रा बाहेरील क्षेत्राच्या सिंचनासाठी कवठे केंजळ उपसा सिंचन योजना प्रस्तावित केलेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने उर्वरित कामे करता आलेली नाहीत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे काम बंद आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेचे सुसुत्रीकरण व प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(१०) * ३१०८२ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेला होणाऱ्या विलंबामुळे विशेषतः नीट (NEET) व जेईई (JEE) यांसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेश प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सुरू करण्यास उशीर होत असून त्यातून शैक्षणिक ताण, असमान व स्पर्धात्मक परिस्थिती निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, इयत्ता दहावीचा निकाल लागल्यानंतर कालमर्यादित व केंद्रीकृत (ऑनलाईन) प्रवेश प्रक्रिया राबवून इयत्ता अकरावीचे शैक्षणिक सत्र माहे जुलै महिन्यातच सुरू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्यासाठी प्रवेश वेळापत्रक निश्चित करणे, अभ्यासक्रम नियोजन सुसंगत करणे तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या शैक्षणिक दिनदर्शिकेत आवश्यक ते बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २०२६-२०२७ मधील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया नियमित व विहीत कालावधीत पार पाडण्यासाठी कागदपत्रांची यादी जाहीर करणे, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी करणे, विद्यार्थ्यांचे प्रोफाईल तयार करणे व इतर अनुषंगिक बाबींसाठी वेळापत्रक जाहिर करण्यात येणार आहे.

तसेच पुढील वर्षाच्या इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या सुसुत्रिकरणासाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे. सदरचे वेळापत्रक अंतिम करण्यात आल्यानंतर त्यानुसार अभ्यासक्रम नियोजन सुसंगत करण्याबाबत आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या शैक्षणिक दिनदर्शिकेत आवश्यक ते बदल करण्याबाबत कनिष्ठ महाविद्यालयांना कार्यवाही करण्यास कळविण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा टाकरखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना व्याजात सवलत देण्याबाबत

**(११) * २९७६७ श्री.सुमित वानखेडे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा टाकरखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त म्हणून काही शेतकऱ्यांना लेव्हिच्या जमिनीचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाटप करण्यात आलेल्या लेव्हिच्या जमिनीची भोगवटा रक्कम शेतकऱ्यांकडून भरून घेण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी भोगवटा रक्कम भरलेली नाही त्या शेतकऱ्यांना जमिनी वाटप करण्यात आल्या तेव्हा पासून १२ टक्के व्याज आकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून १२ टक्के व्याज आकारल्यामुळे लेव्हिची जमिन मिळालेले शेतकरी भोगवटा रक्कम भरू शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर लेव्हिची जमिन वाटप करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना भोगवटा रक्कम भरून घेवून व्याजात सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, हे खरे आहे. अप्पर वर्धा प्रकल्पातील मौजा जाम पिपळा येथील १० प्रकल्पग्रस्तांना मौजा टाकरखेडा येथे एकूण १०.९२ हे. आर. पर्यायी शेतजमिनीचे वाटप करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ मधील तरतुदींनुसार पर्यायी जमिनीची भोगवटा किंमत विहित मुदतीत भरणे अनिवार्य आहे.

(३), (४) व (५)

सदर १० प्रकल्पग्रस्तांपैकी २ शेतकऱ्यांनी पूर्ण भोगवटा रक्कम भरल्यामुळे जमीन त्यांच्या नावे झाली आहे.

उर्वरित ८ प्रकल्पग्रस्तांनी वाटप आदेशानुसार कब्जेहक्कची रक्कम विहित ६ वर्षांच्या मुदतीत वार्षिक हप्त्यांचा भरणा केलेली नाही. त्याअनुषंगाने पुनर्वसन अधिनियम, १९७६ मधील तरतूदी विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील शिक्षक बँकेच्या विविध शाखेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) * ३१०६१ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील शिक्षक बँकेच्या विविध शाखेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षक बँकेत नियमाबाह्य व मोठ्या प्रमाणात कर्जवाटप यासाठी बँकेचे लेखापरिक्षण (ऑडिट) करण्यासाठी लेखापरिक्षकाकडून रु.८ लक्ष ५९ हजार इतके शुल्क आकारलेले असतांनाही त्यांना तब्बल रु.३४ लाख ९० हजार एवढे लेखापरिक्षण शुल्क या शीर्षकाखाली अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, साहित्य खरेदीसाठी कुठल्याही प्रकारची निविदा न काढता गेल्या दोन वर्षात रु.३ कोटी ८३ लाख इतक्या रकमेची खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांचेकडून चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द उक्त बँकेच्या संचालकांसह अध्यक्षांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) व (२) होय.

सदर बँकेचा सन २०२३-२४ वर्षाचा चाचणी लेखापरीक्षण अहवाल व विशेष अहवालानुसार बँकेमध्ये कर्जवाटप करतांना, साहित्य खरेदीमधील अनियमितता तसेच इतर खर्चाचा समावेश लेखापरीक्षण शुल्कामध्ये करुन अनियमितता केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८८ अन्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दिनांक २८.०१.२०२६ रोजी बँकेच्या नुकसानीबाबत जबाबदारी निश्चीत करण्याकरिता आदेश पारीत केला आहे.
(३) होय, बँकेच्या सन २०२३-२०२४ च्या चाचणी लेखापरीक्षण अहवालामध्ये बँकेने दिनांक ३१.०३.२०२३ चे नफा तोटा पत्रकानुसार रु.१८२.१७ लाख व दिनांक ३१.०३.२०२४ चे नफा-तोटा पत्रकानुसार रु.२०१.९६ लाख असे एकूण रु.३८४.१३ लाख एवढी रक्कम स्टेशनरी, छपाई/जाहिरात/संगणक या शिर्षकाखाली खर्च केल्याचे नमूद आहे.
(४) होय.
(५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८८ अन्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दिनांक २८.०१.२०२६ रोजी बँकेच्या नुकसानाबाबत जबाबदारी निश्चीत करण्याकरिता आदेश पारीत केला आहे.

तथापि, सदर आदेशाविरुद्ध श्री. गोकुलदास राऊत व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. १२७५/२०२६ दाखल केली असून प्रस्तुत प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दिनांक ११.०२.२०२६ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्या आदेशास अंतरिम स्थगिती दिली असून प्रकरण मा. उच्च न्यायालयात सध्या न्यायप्रविष्ट आहे.
(६) न्यायप्रविष्ट बाब आहे.

-----------------

**मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शाळांच्या दुरुस्तीसाठी**
**निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(१३) * २९३६३ श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कन्नड, सिल्लोड, गंगापूर, वैजापूर, फुलंब्री (जि.छत्रपती संभाजीनगर) या तालुक्यातील सुमारे १०६४ शाळांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नुकसानग्रस्त शाळांच्या दुरुस्ती, पुनर्बांधणी व सुरक्षिततेसाठी सुमारे रुपये ४२ कोटी ३३ लाख इतक्या निधीची आवश्यकता असल्याचा अंदाज संबंधित विभागामार्फत शासनास सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) कन्नड, सिल्लोड, गंगापूर व फुलंब्री तालुक्यातील ११८ शाळांचे नुकसान झाल्याचे आहे. त्यापैकी ३ शाळांच्या दुरूस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून तरतूद करण्यात आलेली आहे. उर्वरित ११५ नुकसानग्रस्त शाळांच्या दुरूस्ती, पुनर्बांधणी व सुरक्षिततेसाठी रू.३.४६२५ कोटी इतक्या निधीची आवश्यता आहे.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सिएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांद्वारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणेबाबत**

**(१४) * २२९८६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या सुमारे १ लाख ४२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना गेल्या पाच वर्षांपासून सबंधित विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळाला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती अधिकारातून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार एकूण ९,६९,०२९ शिष्यवृत्ती अर्जांपैकी केवळ ७,३३,१३३ विद्यार्थ्यांनाच प्रत्यक्ष लाभ देण्यात आला असून उर्वरित अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापैकी सुमारे ७५,२०३ शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयीन स्तरावर तर ६७,१८० अर्ज सबंधित विभागाच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती' तसेच 'डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता' यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचे लाभ वेळेत न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क भरण्यास आर्थिक अडचणी येत असून त्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज तातडीने निकाली काढून संबंधित विद्यार्थ्यांना लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित महाविद्यालये व दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, भविष्यात अशा प्रकारची दिरंगाई होऊ नये यासाठी शिष्यवृत्ती अर्जांच्या पडताळणीसाठी कालमर्यादा निश्चित करणे, रिअल-टाईम पडताळणी प्रणाली लागू करणे तसेच विद्यार्थ्यांकडून सक्तीची शुल्क वसूली रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शिष्यवृत्तींचे १,४२,३८३ एवढे मागील ५ वर्षातील अर्ज पडताळणी अभावी प्रलंबित असल्याचे दैनिक वर्तमानपत्रांमधील बातम्यांद्वारे माहे, डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले होते.

(२) व (३) माहे डिसेंबर, २०२५ मध्ये शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आल्यावर उच्च शिक्षण संचालक यांचे स्तरावरून त्यांचे परिपत्रक दिनांक ०७.०७.२०२५, दिनांक १५.०९.२०२५,

दिनांक ३०.१०.२०२५, दिनांक २५.११.२०२५, दिनांक ३०.१२.२०२५ व दिनांक ११.०२.२०२६ अन्वये प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज तातडीने पडताळणी करणेबाबतच्या सूचना सर्व विभागीय सहसंचालक यांना देण्यात आल्या. तसेच वेळोवेळी ऑनलाईन बैठका घेऊन प्रलंबित शिष्यवृत्तींचे अर्ज पडताळणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

उपरोक्त सूचना दिल्यानंतर प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांची जलद गतीने पडताळणी करण्यात आली. दिनांक ९.३.२०२६ रोजी पर्यंत संस्थास्तरावर ३८६२८ व विभाग स्तरावर १४१६६ शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत. या सर्व प्रलंबित अर्जांची जलदगतीने पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

दिनांक ९.३.२०२६ रोजीच्या महाडीबीटी पोर्टलवरील अहवालानुसार अर्जांची सद्य:स्थितीचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | अर्ज केलेले विद्यार्थी | लाभार्थी विद्यार्थी | संस्था स्थरावर प्रलंबित अर्ज | विभागस्तरावर प्रलंबित अर्ज | शिष्यवृत्ती निधी वितरण (रू. हजारात) |
|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | १८३३३६ | १७४४३१ | ६०६ | ६८ | ११७३३३९ |
| २०२२-२३ | १७७२१७ | १६९१७१ | १३५३ | ३७ | १३८८३६४ |
| २०२३-२४ | १८१८२९ | १७३८०३ | १५३८ | ९८ | १६५७२९१ |
| २०२४-२५ | २२६५४३ | २०८२६० | ४७९९ | ५६८ | २४०१४०५ |
| २०२५-२६ | २०७३२७ | ५४८३६ | ३०३३२ | १३३९५ | ४६३७५७ |
| **एकूण** | **९७६२५२** | **७८०५०१** | **३८६२८** | **१४१६६** | **७०८४१५७** |

उपरोक्त विवरणपत्रात दर्शविल्यानुसार मागील ५ वर्षात प्राप्त ९७६२५२ प्राप्त अर्जांपैकी ७८०५०१ एवढ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून यासाठी रू. ७०८.४१ कोटी एवढा निधी वितरीत केला आहे. त्यानुसार शिष्यवृत्ती निधीचा विद्यार्थ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने प्रभावी वापर करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मागील ५ वर्षात ९०३७४९ प्राप्त अर्जांपैकी ७,३९,५२१ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला असून यासाठी रू. ६६४.४४ कोटी एवढा निधी वितरित करण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत मागील ५ वर्षात ३८,६२४ प्राप्त अर्जांपैकी २४,४०६ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला असून यासाठी रू. ३८.३० कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे या योजनेअंतर्गत लाभ न मिळाल्याची तक्रार प्राप्त नाही.

(५), (६) व (७) प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांची तातडीने पडताळणी करण्याबाबत उच्च शिक्षण संचालक स्तरावरून सर्व विभागीय सहसंचालक यांना परिपत्रकान्वये तसेच ऑनलाईन बैठकांद्वारे वेळोवेळी सूचना देण्यात आल्या. शिष्यवृत्तीच्या अर्जासह विद्यार्थी आवश्यक कागदपत्रे जोडत नाहीत, विद्यार्थी अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयास सादर करत नाहीत, तसेच विद्यार्थ्यांनी अचूक कागदपत्रे सादर न करणे इ. कारणांमुळे शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणी अभावी प्रलंबित राहतात. यामध्ये महाविद्यालये दोषी असल्याचे दिसून येत नाही. महाडीबीटी पोर्टल सर्व विभागांच्या शिष्यवृत्तीसाठीचे पोर्टल आहे. सदर पोर्टल सर्व विभागांच्या अभ्यासक्रमांसाठी समान पोर्टल असून कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये या दृष्टीकोनातून नवीन शैक्षणिक वर्षापासून सुरू झालेले पोर्टल पुढील शैक्षणिक वर्षानंतर सुध्दा सुरू असते. त्यानुसार सादर

झालेल्या अर्जांची पडताळणी सुरू असते. ही प्रक्रिया निरंतर सुरू असणारी प्रक्रिया आहे. यास्तव अर्ज पडताळणीसाठी कालमर्यादा निश्चित करता येत नाही. विद्यार्थ्यांकडून सक्तीची शुल्क वसूली करण्यात येत असलेबाबत तक्रार प्राप्त नाही.

-----------------

**राज्यातील पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी 'आय (I) स्कीम' पाठ्यक्रम बंद करून 'के (K) स्कीम' पाठ्यक्रम लागू करण्याबाबत**

**(१५) * २८१०८ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी सन २०१६ नंतर टप्प्या-टप्प्याने लागू करण्यात आलेली 'आय स्कीम' राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून पदविका अभ्यासक्रमातील प्रथम व द्वितीय सत्रासाठी 'आय स्कीम' पूर्णतः बंद करून 'के स्कीम' मधील विषयांच्या परीक्षेला विद्यार्थ्यांना अनिवार्यपणे बसावे लागणार असल्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'आय स्कीम' अंतर्गत प्रथम अथवा द्वितीय सत्रात अनुत्तीर्ण, एटीकेटी धारक अथवा अनेक वर्षांपासून परीक्षा प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांना यापुढे 'आय स्कीम' च्या विषयांमध्ये परीक्षा देता येणार नाही व त्यांना 'के स्कीम' मधील समतुल्य विषयांमध्ये परीक्षा द्यावी लागणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निर्णयामुळे अडचणीत आलेल्या विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने 'आय स्कीम' व 'के स्कीम'मधील समतुल्य विषय, विषय कोड व बदललेल्या अभ्यासक्रमाबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना जाहीर करण्याबाबत तसेच, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा पाठयक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध तरतुदींचा अंतर्भाव करुन सुधारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापूर्वीचा सन २०१७ पासून सुरु असलेला 'आय' (I) स्कीम नावाने संबोधण्यात येत असलेला पाठ्यक्रम (Syllabus) टप्पा- टप्प्याने बंद करण्यात आलेला आहे.
(२) होय, खरे आहे.

पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा पाठयक्रम २०२३-२४ पासून सुधारित करुन 'के' (K) स्कीम या नावाने राबविण्यात येत आहे.

(३) होय, खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात आल्याने 'आय' (I) स्कीम अभ्यासक्रम टप्प्या- टप्प्याने पूर्णपणे बंद होऊन नवीन (K) स्कीम अभ्सासक्रम लागू करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ परिक्षा नियमावलीतील नियम क्रं. RG १८ च्या तरतुदीनुसार नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर, पुढील चार परिक्षा नंतरच्या परिक्षा या 'के' (K) स्कीम मधील नवीन समकक्ष विषयांप्रमाणे घेण्यात येणार आहेत.

(४) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे दिनांक १२.०१.२०२६ चे परिपत्रकानुसार प्रथम वर्षातील 'के' (K) स्कीम अभ्यासक्रमातील समकक्ष विषयाची यादी, विषय कोड व मार्गदशन सूचना मंडळाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत तसेच, सर्व संबंधित संस्थाच्या प्राचार्यांना त्यांचे संस्थेतील विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

समकक्ष विषय हे तज्ञ समितीकडून तपासण्यात आलेले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नसल्याबाबत खात्री करण्यात आली.

(५) प्रश्न उध्दवत नाही.

-----------------

## राज्यातील शालेय अभ्यासक्रमात 'कृषी' विषयाचा समावेश करुन त्याची अंमलबजावणी करणेबाबत

**(१६) * २३४३१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय अभ्यासक्रमात 'कृषी' हा विषय समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने सुमारे दीड वर्षांपूर्वी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर निर्णयाच्या अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे, खरे आहे.

(२) नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार इयत्ता तिसरी ते इयत्ता दहावी चा शालेय अभ्यासक्रम निर्मिती करताना व्यवसाय शिक्षण विषयाच्या समिती समोर कृषी विषयाचा अभ्यासक्रम ठेवण्यात आला आहे. कृषी विषयक अभ्यासक्रमाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार आहे.

(३) व (४) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२३, व राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार कृषी विषय घटकांचा समावेश शालेय शिक्षण अभ्यासक्रमातील इयत्ता ३ री ते ५ वी या स्तरासाठी कार्यशिक्षण विषयात, ६ वी ते १० वी या स्तरासाठी व्यवसाय शिक्षण विषयांतर्गत करण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रम मंजुरीसाठी सुकाणू समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

इयत्ता ३ री ते ५ वी या स्तरासाठी कार्यशिक्षण या विषयांतर्गत इयत्ता ३ री साठी परसबागेतील

कार्य, पशुपक्ष्यांशी निगडित व्यवसाय, इयत्ता ४ थी साठी स्थानिक पिके व परसबाग, व शेतीपूरक व्यवसाय, इयत्ता ५ वी साठी परिसरातील शेती व शेतीपूरक व्यवसाय, शेतीपूरक व्यवसायाचे प्रकार या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच इयत्ता ६ वी साठी शालेय परसबाग व जैवविविधता, इयत्ता ७ वी साठी अधिवास उद्यान व शालेय रोपवाटिका संगोपन, इयत्ता ८ वी साठी सेंद्रिय शेती व पाळीव प्राण्यांचे पोषण (खाद्य) व काळजी, इयत्ता ९ वी साठी तृणधान्य उत्पादन व बागकाम तसेच इयत्ता १० वी साठी संरक्षित शेती तंत्रज्ञान व कुक्कुट पालन या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धाराशिव जिल्हयातील शेत मालाला जास्त भाव देण्याचे आमिष दाखवून व्यापारी शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याबाबत**

**(१७) * ३०१८० डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्हयातील सर्वच तालुक्यातील रब्बी हंगामातील पीक बाजारात येत असतांना काही अवैध व्यापारी जास्त दराचे आमीष दाखवून शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजार समितीचा परवाना न घेता गावागावांत जाऊन शेतमालाला जास्त भाव देण्याचे आमिष दाखविणाऱ्या व्यापाऱ्यांचे जाळे वाढत आहे तर काही व्यापारी बाजार समितीच्या आवाराबाहेर अप्रमाणित कोऱ्या पावती पुस्तकाद्वारे शेतमालाची खरेदी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीमध्ये दोषी असलेल्या अवैध व्यापाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयास अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आयसीटी मुंबई, सीओईपी पुणे व एलआयटी नागपूर या अभियांत्रिकी विद्यापीठांमध्ये प्रवेश प्रक्रियेत संविधानिक आरक्षणाची अंमलबजावणी करणेबाबत**

**(१८) * ३०९४५ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयसीटी मुंबई, सीओईपी पुणे व एलआयटी नागपूर या अभियांत्रिकी अभिमत विद्यापीठांमध्ये प्रवेश प्रक्रियेवेळी संविधानिक आरक्षणाच्या तरतुदींना डावलण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यमान नियमांनुसार १०० टक्के जागांवर शैक्षणिक आरक्षण लागू असताना संबंधित विद्यापीठांनी केवळ ७० टक्के जागा आरक्षित प्रवर्गासाठी राखून उर्वरित ३० टक्के जागा अखिल भारतीय स्तरावर खुल्या प्रवर्गासाठी उपलब्ध करून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

आयसीटी मुंबई, एलआयटी नागपूर आणि सीओईपी पुणे या तीन अभियांत्रिकी विद्यापीठांना एकल विद्यापीठ म्हणून शासन मान्यता आहे. या विद्यापीठांमध्ये शासनाने निर्धारीत केलेल्या प्रवेश नियमानुसार राज्यस्तरीय कोटयासाठी सांविधानिक आरक्षणानुसार प्रवेश करण्यात आलेले आहेत.
(२) आयसीटी मुंबई, एलआयटी नागपूर या एकल विद्यापीठांमधील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या उपलब्ध जागांपैकी ७० टक्के व सीओईपी पुणे विद्यापीठामधील ८० टक्के जागा या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी संविधानिक आरक्षणासह प्रवेशासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

सदर संस्था नामांकित संस्था असून संस्थेतील कार्य तसेच जागतिक व राष्ट्रीय पातळीवरील स्थान विचारात घेऊन, सदर विद्यापीठांनी घेतलेल्या निर्णयास अनुसरून शासन मान्येतेने आयसीटी मुंबई, एलआयटी नागपूर विद्यापीठासाठी एकुण प्रवेश क्षमतेच्या ३० टक्के व सीओईपी पुणे विद्यापीठासाठी २० टक्के जागा अखिल भारतीय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(३) शासन मान्यतेनुसार सदर धोरण राबविण्यात येत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत वीजपुरवठा पूर्ववत करुन विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१९) * ३११६३ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील खरम्याचा पाडा येथील जिल्हा परिषद शाळेत मागील सुमारे एक वर्षापासून वीजपुरवठा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणापासून वंचित रहावे लागत असून परिणामी विद्यार्थ्यांची पटसंख्या घटत जाऊन शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी पाड्यांतील सर्व जिल्हा परिषद शाळांचा आढावा घेऊन वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून पटसंख्या वाढीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, पालघर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा व संबंधित ग्रामपंचायतींना नियमित व पुरेसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, खरम्याचा पाडा या शाळेच्या थकीत विद्युत देयकामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. सद्य:स्थितीत थकीत विद्युत देयक भरणा करण्यात आल्याने विद्युत सुविधा सुरळीत सुरु आहे.
(२) व (३) शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ४५७ शाळांपैकी ४०२ शाळांमध्ये विद्युतपुरवठा सुरळीतपणे सुरु आहे. उर्वरित ५५ शाळांमधील थकीत विद्युत देयके भरणा करण्याबाबत आदेशित केले असून खंडित वीजपुरवठा सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील जिल्हा परिषद शाळांचे नियमित व थकीत विद्युत देयके भरण्यासाठी रु. १८.४३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी ठाणे जिल्ह्यासाठी रु.१.०१ कोटी व पालघर जिल्ह्यासाठी रु.३१.५५ लक्ष इतका निधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे नियमित तसेच थकीत देयके भरण्यासाठी महावितरणला वर्ग करण्यात आला आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांची विद्युत देयके वेळेवर अदा करण्यासाठी संयुक्त बिलिंग (Composite Billing) पद्धतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) येथील शिवणगाव व बोर नदी या दोन्ही सिंचन प्रकल्पातील शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत

**(२०) * ३१०१९ श्री.राजेश वानखडे (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) येथील शिवणगाव व बोर नदी या दोन्ही सिंचन प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी सरळ खरेदी पद्धतीने भूसंपादन करण्यात आल्या असून पश्चिम विदर्भातील या शेतकऱ्यांनी अनेक वर्षे शासनाकडे सातत्याने निवेदने, आंदोलने व उपोषण केल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी निर्णय घेऊन या शेतकऱ्यांना रुपये ५ लक्ष सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सिंचन प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय निर्गमित होऊन एक वर्ष उलटूनही सानुग्रह अनुदानाची रक्कम अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना प्रलंबित असलेली रुपये ५ लक्ष सानुग्रह अनुदानाची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) सदर प्रकल्पाच्या सानुग्रह अनुदान रकमेसाठी निधी मागणी शासनाकडे प्राप्त असून, निधी

उपलब्धतेनुसार वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये 'त्रिभाषा धोरण' निश्चित करण्याबाबत

**(२१) * ३०६९७ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये 'त्रिभाषा धोरण' निश्चित करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीस दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने अहवाल शासनास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीच्या अहवालात कोणत्या प्रमुख शिफारशी करण्यात आल्या आहेत त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याकरिता शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने दिनांक ०४.०२.२०२६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला आहे.
(३) सदर समितीने सादर केलेल्या अहवालास मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असून मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरासाठी मुळशी व चासकमान धरणातून पाणी आरक्षित करण्याबाबत

**(२२) * ३०२७६ श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून भविष्यातील वाढती पाण्याची गरज भागविण्यासाठी नवीन जलस्रोत निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत शहराला पवना, आंद्रा आणि भामा-आसखेड धरणांतून पाणी पुरवठा केला जात असला तरी, भविष्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिका प्रशासनाने मुळशी धरणातून पिंपरी-चिंचवड शहरासाठी पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, चासकमान धरणातून पाणी आरक्षित करण्याबाबत सन २००८ मध्ये प्रकल्पाला सुरुवात झाली, मात्र स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे या प्रकल्पाचे काम प्रलंबित असून अद्याप प्रत्यक्षात काम सुरू होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकल्पपूर्तीसाठी आवश्यक असलेले फेर नियोजन आणि स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात प्रशासकीय यंत्रणा अपयशी ठरत असल्यामुळे ३० लाख नागरिकांच्या पाणी प्रश्नात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पिंपरी-चिंचवड शहराकरिता मुळशी व चासकमान धरणातून पाणी आरक्षित करण्याबाबत तसेच चासकमान प्रकल्पाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

पिंपरी चिंचवड शहराची २०३१ मध्ये ५२.७४ लक्ष लोकसंख्या होईल हे गृहीत धरून पवना प्रकल्पातून ६.६५ टीएमसी, आंद्रा प्रकल्पातून १.३० टीएमसी व भामा आसखेड धरणातून २.१५ टीएमसी असे एकूण १०.०१ टीएमसी पाणी आरक्षण मंजूर केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांच्या दिनांक ६.१२.२०२३ च्या पत्रान्वये मुळशी धरणातून अतिरिक्त ९.८१ टीएमसी पाण्याची मागणी केली आहे. परंतु, शासन निर्णय, दिनांक २०.०७.२०१९ मधील तरतूदीच्या अनुषंगाने विहित नमुन्यातील आरक्षण मंजुरीचा प्रस्ताव महापालिकेकडून अद्याप अप्राप्त आहे.
(४) हे खरे नाही.

चासकमान धरणाचे बांधकाम १९७६ साली सुरु होवून १९९३ साली पूर्ण क्षमतेने पाणीसाठा सुरु करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस चासकमान धरणातून पाणी आरक्षण मंजूर नाही.
(५), (६) व (७) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## करवीर (जि.कोल्हापूर) तालुका पंचायत समिति कर्मचारी सह. पतसंस्था मर्या., कोल्हापूर या पतसंस्थेच्या ठेव रकमेत झालेला गैरव्यवहार

**(२३) * २७४४९ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत करवीर तालुका स्तरावर कार्यरत वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांसाठी करवीर तालुका पंचायत समिति कर्मचारी सह. पतसंस्था मर्या., कोल्हापूर या पतसंस्थेच्या ठेव रकमेत मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४ पासून सर्व सभासद/ ठेवीदार यांनी केलेल्या मागणीनंतर सन २०२३ - २०२४ चे वैधानिक लेखापरीक्षण करण्यात आले असून त्यामध्ये संचालक मंडळाशी संगनमत करून लेखापरीक्षण अहवाल तयार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत जिल्हा पोलीस प्रमुख, कोल्हापूर यांनी गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले असून फेर

लेखापरीक्षण अहवालानुसार सर्व संबंधित व्यक्तींवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८८ नुसार जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गुन्ह्यातील कायदयान्वये जामीन मंजूर करण्याची तरतूद नसतानाही संबंधितांना अटकपूर्व जामीन देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त पतसंस्थेच्या ठेव रकमेमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) रू.२४,६९,५३,८४९/- इतक्या रकमेच्या संस्थेच्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये दिनांक २८/१०/२०२५ रोजीचे आदेशान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सद्य:स्थितीत चौकशीचे कामकाज सुरू आहे.
(४) सदर गुन्ह्यात ३४ दोषी व्यक्तींविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल झाला. सदर ३४ आरोपीपैंकी २ आरोपी मयत व २ आरोपी फरार असून ३० आरोपींना मा. उच्च न्यायालय मुंबई, सर्किट बेंच कोल्हापूर यांनी अंतरिम जामीन मंजुर केला आहे. याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई, सर्किट बेंच कोल्हापूर यांचेकडे सुनावणी सुरु आहे.
(५) दिनांक ६/१२/२०२४ रोजी प्रथम खबर क्र.०४६०/ २०२४ अनुसार एकुण ३४ दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. दिनांक १४/०१/२०२५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ अ अन्वये संचालक मंडळाऐवजी प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली आहे.

दिनांक २८/१०/२०२५ रोजीचे आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करणेबाबत

**(२४) * ३०३०० श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अनेक शाळांमध्ये सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार ‘अतिरिक्त’ ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०२६ तसेच त्यापूर्वीच्या काही महिन्यांचे वेतन कोणताही अधिकृत शासन निर्णय निर्गमित न करता थांबविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या इयत्ता दहावी व बारावीच्या मंडळ परीक्षांचा कालावधी सुरू असताना संबंधित शिक्षक परीक्षेच्या कामकाजात कार्यरत असतानाही वेतन रोखण्यात आल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवून त्यांच्या मनोबलावर विपरीत परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिक्षण संचालनालयाकडून दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी समायोजन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेतन सुरू ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आलेले असतानाही संबंधितांचे वेतन थांबविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविण्याबाबत कोणतेही आदेश देण्यात आलेले नाहीत. शून्य पटसंख्या असलेल्या शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत अशा शाळांमध्ये शून्य पट व शून्य पदे असल्याने अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे वेतन देयक हे शून्य पटसंख्येच्या शाळांमधून आहरित केले जाऊ शकत नाही.

सदर अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन आहरीत करण्यासाठी त्यांचे तात्पुरत्या स्वरूपात इतर शाळांमध्ये समायोजन करून, समायोजन करण्यात आलेल्या शाळेत शालार्थ प्रणालित पद कार्यान्वित करण्यासाठी संबंधीत शाळेकडून प्रस्ताव मागवून पद कार्यान्वित करून कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२५) * ३०६५५ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही शाळांमध्ये घडलेल्या अनुचित घटनांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेऊन जिल्हा वार्षिक नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांमधील एकूण २,१२० प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सीसीटीव्ही खरेदी प्रक्रिया राबविण्यात आल्याची बाब दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा परिषदेने सीसीटीव्ही खरेदीसाठी अंदाजे रु.५ कोटी इतका अपेक्षित खर्च नमूद केला असून जिल्हा नियोजन समितीमार्फत केवळ ३९ शाळांसाठी रु.३ कोटी ६० लाख इतका निधी मंजूर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका शाळेसाठी अंदाजे ८ ते ९ लाख रुपये खर्च करण्यात आल्यामुळे सीसीटीव्ही खरेदी प्रक्रियेत कथित गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पालघर यांनी पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याच्या कामाची खरेदी प्रक्रिया राबविण्याकरिता जिल्हा नियोजन समिती, पालघर या कार्यालयाच्या स्तरावर निविदा प्रक्रिया व खरेदी प्रक्रिया राबविण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन समिती, पालघर या कार्यालयामार्फत सदर कामांतर्गत ३९ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकरिता GEM प्रणालीद्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

सदर योजनेअंतर्गत प्राथमिक विभाग, जि. प. पालघर यांच्या रूपये ३.६० कोटी रकमेची तांत्रिक मान्यता असलेल्या प्रस्तावास जिल्हा नियोजन समिती, पालघर यांच्या कार्यालयाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

(३) वीर माता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेकडून तयार करून घेतलेल्या तांत्रिक मापदंडानुसार प्रति शाळा रक्कम एकूण रुपये ९.३० लक्ष इतकी निश्चित करण्यात आली आहे व त्याप्रमाणे शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरिता GEM प्रणालीद्वारे ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये कोणतेही गैरप्रकार झाल्याची तक्रार उपलब्ध नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पाठ्यपुस्तक छपाईसाठी निकृष्ट दर्जाचा कागद वापरल्याबाबत

**(२६) * २६०२४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांनी प्राथमिक शिक्षण विभागासाठी २०२६ या शैक्षणिक वर्षाकरिता जाहीर केलेल्या निविदेनुसार कागदाचा दर्जा १०० जीएसएम ऐवजी ७० जीएसएम ठेवण्यात आल्याची तसेच कागदाच्या शुभ्रतेचे प्रमाण ८५ टक्क्यांवरून ७८ टक्क्यांपर्यंत कमी करून निकृष्ट दर्जाची पाठ्यपुस्तके छापण्यात आल्याचे व त्यामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बालभारतीमार्फत एकूण किती रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत तसेच पाठ्यपुस्तक छपाईचे कंत्राट कोणत्या कंपनीस देण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेतील कथित अनियमिततेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाची पुस्तके छापणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध व संबंधित दोषी शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्याकडून कागद खरेदीसाठी २१९.७९ कोटी रुपयांची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. नियामक मंडळ ठराव क्रमांक ५५९३, दिनांक ०६ जानेवारी, २०२६ अन्वये मे. सातिया पेपर मिल. (पंजाब), मे. श्रेयांस पेपर

मिल, (नवी दिल्ली) व मे. मालू पेपर मिल. (नागपूर) या कागद गिरण्यांना कागद पुरवठा करण्याचे कार्यादेश देण्यात आले आहेत.
(३) ई-निविदा प्रक्रिया राबवून कागद खरेदी करण्यात आली असून याबाबत कोणतीही अनियमितता झालेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२७) * ३०८१२ डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सध्या अस्तित्वात असलेले संचालक मंडळ हे तोटयात असलेल्या बँकेला आर्थिकदृष्टया सक्षम करण्याऐवजी मोठया प्रमाणात गैरव्यवहार करीत असून सदर संचालक मंडळाच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांना दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्याच्या अस्तित्वातील संचालक मंडळापैकी किमान पाच संचालक हे संचालक मंडळावर राहण्यास अपात्र असताना सुध्दा बँकेचे कामकाज पहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनात संचालक मंडळाच्या कथीत गैरव्यवहाराबाबत सविस्तर दिलेल्या माहितीच्या आधारे अस्तित्वातील संचालक मंडळाची चौकशी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त चौकशीतील दोषी संचालक मंडळ आणि त्या संचालक मंडळाच्या गैरव्यवहाराला सहकार्य करणाऱ्या बँकेतील कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

मा.डॉ.तानाजी सावंत, विधानसभा सदस्य यांनी धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांना दिनांक २३.०८.२०२५ रोजी दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) अंशत: खरे आहे,

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ च्या कलम १०A मधील उपकलम २A मधील (i) (ii) च्या तरतूदीनुसार सहकारी बँकेचे संचालक सलग १० वर्षापेक्षा जास्त काळ बँकेच्या संचालक पदावर राहू शकत नाहीत.

धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन २०१५ ते २०२० व सन २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी निवडून आलेल्या सदस्यांपैकी बँकेच्या सध्या कार्यरत असलेल्या संचालक मंडळातील सदस्यांपैकी ७ सदस्य बँकेच्या संचालक पदावर सलग १० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता कार्यरत असल्यामुळे ते बँकेच्या संचालक पदावर राहण्यास अपात्र ठरतात.

सदर ७ संचालकांपैकी १ संचालकास विभागीय सहनिबंधक, लातूर यांनी दिनांक २२.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कअ (१) (फ)

(सात) मधील तरतूदीनुसार समितीचा सदस्य असण्याचे व त्याची जागा रिकामी झाल्याचे घोषित केले आहे. तसेच उर्वरित ६ संचालकांविरुध्द बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ चे कलम १०A अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेस प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय.

मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २३.०८.२०२५ रोजीच्या तक्रारीस अनुसरुन दिनांक २४.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) छत्रपती संभाजीनगर यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार चौकशी अधिकारी यांनी तक्रार अर्जातील मुद्यांची तपासणी करुन दिनांक १०.१२.२०२५ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना अहवाल सादर केला आहे.

(४) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षण), छत्रपती संभाजीनगर यांनी मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २३.०८.२०२५ रोजीच्या अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करुन दिनांक १०.१२.२०२५ रोजी अहवाल सादर आहे. सदर चौकशी अहवालात नोंदविलेल्या अभिप्रायानुसार याप्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी दिनांक २६.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.